963

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक:रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.९/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरूचौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०५/०५/२०१६

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)

विषय :- डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ मध्ये मुदती संपणाऱ्या नगरपरिषदा/ नगरपंचायती सार्वत्रिक निवडणुका..... सदस्य संख्या निश्चिती करणे..

संदर्भ :- १) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने आदेश क्र. नपसु-२००१/प्र.क्र.१/ २००१/५ , दि.०१ जानेवारी, २००१.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/नप-२०१४/प्र.क्र.१५/का.६, दि.२२/०५/२०१५
३) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१३/सं.क्र.१३८/का.५ दि.११/०२/२०१४
४) राज्य निवडणूक आयोगाचे मा. मुख्यमंत्री यांना पाठविलेले अ.शा. पत्र क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१९/का.६, दि.०४/०२/२०१६
५)राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य सचिव यांना पाठविलेले अ.शा. पत्र क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१९/का.६, दि.१९/०१/२०१६

महोदय,

आपणास माहितीच आहे की, राज्यातील १९१ नगर परिषदा व ४ नगर पंचायतींची मुदत माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीमध्ये संपुष्टात येत आहेत. तत्पूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे बंधनकारक आहे.

२. महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ (२) नुसार संचालकांनी, नगरपरिषद व नगरपंचायत सदस्यांची संख्या निश्चित केली पाहिजे, तसेच सदस्य संख्या निश्चितीचे आदेश राजपत्रात प्रसिध्द करावयाचे आहे. संचालकांचे हे अधिकार उपरोक्त संदर्भ क्र.१ येथे नमूद दि.०१/०१/२००१ च्या आदेशाद्वारे संबंधित प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांना प्रदान केलेले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भ क्र.२ येथे नमूद आदेशाद्वारे मुदत संपणाऱ्या नगर परिषदा/ नगर पंचायतीच्या बाबतीत सदस्य संख्या निश्चितीचे आदेश मुदत समाप्तीच्या दिनांकापूर्वी ६ महिने अगोदर काढणे आवश्यक आहे.

नगरपरिषद/नगरपंचायतीच्या निवडणुकीकरिता २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरावयाची असून जनगणनेची आकडेवारी प्राप्त करुन घेण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भ क्र. ३ येथील पत्राद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

नगर परिषदा/ नगर पंचायतींच्या हद्दींमध्ये दि.०१/०६/२०१६ नंतर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करण्यात येऊ नये, याबाबत आयोगाने मा. मुख्यमंत्री व मा. मुख्य सचिव यांना उपरोक्त संदर्भ क्र. ४ व ५ येथे नमूद दिनांक ०४/०२/२०१६ व १९/०१/२०१६ दिनांक च्या पत्रान्वये कळविले आहे.

३ मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी वेळोवेळी घेतलेल्या विभागीय स्तरावरील बैठकांमध्ये मुदती संपणाऱ्या नगर परिषदा/ नगरपंचायतीच्या प्रभाग रचना दि.०१ जून ,२०१६ पासून सुरु करणे आवश्यक असल्याबाबत निदेश दिले आहे.

४. उपरोक्त निदेश व सूचना ध्यानी घेता आपण मुदती संपणाऱ्या नगर परिषदा/ नगर पंचायतीच्या सदस्य संख्या निश्चितीची प्रक्रिया वेळीच पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु केलेली असेलच.

५. नगरपरिषदा/ नगरपंचायतीची सदस्य संख्यानिश्चित करताना खालील मुद्दे प्रामुख्याने ध्यानी घेणे आवश्यक आहे.

i) २०११ च्या जनगणना कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतलेली एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या व अनुसूचित जमातीची लोकसंख्या विचारात घ्यावी.

ii) संपूर्ण नगरपरिषदेच्या हद्दीच्या आतमध्ये लोकसंख्या सदस्यसंख्या निश्चिती करता विचारात घ्यावी, हद्दीतील कोणताही भाग वगळला जाणार नाही किंवा बाहेरील भाग समाविष्ट होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याकरिता संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडून खालीलप्रमाणे लोकसंख्येबाबतचे प्रमाण पत्र घेण्यात यावे.

प्रमाणपत्र

"मी......... मुख्याधिकारी,....... नगरपरिषद/ नगरपंचायत जिल्हा........... असे प्रमाणित करतो की, ...... नगर परिषदेची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ......., अनुसूचित जातीची लोकसंख्या........ व अनुसूचित जमातीची लोकसंख्या ....... इतकी असून, ही लोकसंख्या व नकाशे मी जनगणना कार्यालयाकडून प्राप्त केले असून नगरपरिषदेची लोकसंख्या निश्चित करताना नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या हद्दीमध्ये कोणताही वगळलेला नाही किंवा हद्दीबाहेरील कोणताही भाग समाविष्ट केलेला नाही याची खात्री केली आहे."

स्वाक्षरी

iii) मागील व येणाऱ्या निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय असेल आणि जर ते मागील निवडणुकीमध्ये महिलेसाठी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती महिलेकरिता राखीव असल्यास, ते पद येणाऱ्या निवणुकीकरिता या

९०५

प्रवर्गातील महिलेसाठी राखीव असणार नाही. आणि जर मागील निवडणुकीमध्ये ते पद महिलेसाठी अराखीव असल्यास ते यावेळेस थेट महिलेसाठी नेमून देण्यात यावे. (राज्य निवडणूक आयोगाचे दि. १० जुलै, २००९ च्या आदेशामधील परि.क्र.६ कृपया पहावा.)

iv) नगरपरिषद/ नगर पंचायतींच्या एकूण पदांच्या ५० टक्के पेक्षा जास्त पदे महिलांसाठी राखीव होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. (उदा. १७ पैकी ९ किंवा २५ पैकी १३ महिलांसाठी देय होतील.)

६ उपरोक्त सूचना ध्यानी घेऊन नगरपरिषद/ नगरपंचायती सदस्य संख्या दि. १६ मे, २०१६ पर्यंत निश्चित करुन राजपत्रात प्रसिध्द करावी व राजपत्राची एक प्रत तात्काळ राज्य निवडणूक आयोगास सादर करावी.

प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम लवकरच देण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपला,

(ध.मा.कानेड)
उप सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :

१. जिल्हाधिकारी (सर्व)
२. मुख्याधिकारी (१९१ नगरपरिषदा व ४ नगर पंचायती)
३. निवड नस्ती

६/५/२०१६

C/Letter/Letter Formats/DMK